डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा दि.१५ ऑक्टोबर हा जन्मदिन, “ वाचन प्रेरणा दिवस ” म्हणून साजरा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः बैठक -२४१३/(प्र.क्र.१४०/१५)/समन्वय

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.

तारीख: ०७ ऑक्टोबर, २०१७.

<u>वाचा -</u> शासन परिपत्रक क्रमांकः बैठक -२४१३/(प्र.क्र.१४०/१५)/समन्वय, दि.०९ ऑक्टोबर, २०१५.

<u>शासन परिपत्रक -</u>

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या अनुषंगाने त्यांचा दि.१५ ऑक्टोबर हा जन्मदिन, “ वाचन प्रेरणा दिवस ” म्हणून साजरा करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये व समाजाच्या इतर घटकांना वाचनाची आवड व प्रेरणा निर्माण होणे व वाचनाचे महत्त्व जाणून घेण्यासाठी दि.१५ ऑक्टोबर, २०१५ हा “ वाचन प्रेरणा दिवस ” म्हणून साजरा करण्याबाबत संदर्भाधीन परिपत्रकानुसार कळविण्यात आले आहे. तथापि, या वर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस सार्वजनिक सुट्टीचा येत असल्यामुळे राज्यातील महाविद्यालये, शैक्षणिक संस्था व शासकीय कार्यालये यांनी “ वाचन प्रेरणा दिवस ” सुट्टीच्या आदल्या दिवशी साजरा करावा आणि सार्वजनिक व खाजगी ग्रंथालये, साहित्यिक / सांस्कृतिक संस्था यांनी दि.१५ ऑक्टोबर या दिवशीच साजरा करावा. शासन परिपत्रक क्रमांकः बैठक -२४१३/(प्र.क्र.१४०/१५)/समन्वय, दि.०९ ऑक्टोबर, २०१५ मधील सूचनांचे अनुपालन करण्याबरोबरच हा उपक्रम राबविण्यासाठी खालील उपक्रमांचेदेखील आयोजन करण्यात यावे. :-

१ वाचन प्रेरणा किंवा वाचन संस्कृतीशी संबंधित विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात यावे.

२ वाचन प्रेरणा किंवा वाचन संस्कृतीशी संबंधित विषयावर चर्चासत्र / परिसंवाद/कार्यशाळा घ्याव्यात.

३ लेखकांशी त्यांच्या लेखनाविषयी, त्यांच्या कलाकृतीविषयी चर्चा किंवा त्यांची प्रकट मुलाखत घेण्यात यावी.

४ भारतातील पहिलं पुस्तकांचं गाव (भिलार, ता. महाबळेश्वर, जि. सातारा) या उपक्रमाची माहिती. विविध माध्यमातून विद्यार्थ्यांना देणे किंवा निवडक विद्यार्थ्यांना घेऊन, अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात यावे.

५ हे वर्ष कविवर्य विंदा करंदीकर यांचे जन्मशताब्दी वर्ष असल्याने, त्यांच्या साहित्यावर समर्पक उपक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

६ सुसंगत स्पर्धा (निबंध स्पर्धा किंवा काव्यवाचन स्पर्धा किंवा अभिवाचन स्पर्धा इत्यादी) घेण्यात याव्यात.

७ विद्यार्थ्यांनी किंवा वाचकांनी आवडत्या पुस्तकाविषयी आणि लेखकाविषयी लेखी किंवा तोंडी मनोगत व्यक्त करावे.

८ वाचन कौशल्याचा विकास या विषयावरील प्रशिक्षण व सादरीकरण करण्यात यावे.

९ वृत्तपत्रातील अग्रलेख / प्रमुख लेखांचे वाचन करण्यात यावे.

१० ई-बुकचे सामूहिक वाचन करण्यात यावे.

११ निवडक कथा, कविता आणि उतारे यांचे अभिवाचन करण्यात यावे.

१२ एखाद्या सुप्रसिद्ध पुस्तकातील महत्त्वाच्या /निवडक पानांचे सामूहिक वाचन (पारायण) करण्यात यावे.

१३ प्रकाशक /वितरक /ग्रंथालये यांच्या सहकार्याने पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात यावे.

१४ **<u>संकल्प</u>** - महिन्यातील एक दिवस " नो गॅजेट डे " म्हणून कृतीत आणण्याचे आवाहन. (" नो गॅजेट डे " - मोबाईल, व्हॉटस्‌अॅप, फेसबुक, ट्विटर न वापरता तो वेळ वाचनासाठी देणे.)

१५ सलग काही वेळ (शांतपणे, एकट्याने) वाचनाचा उपक्रम (विद्यार्थी /वाचक एखाद्या वर्गात / सभागृहात बसून एकट्याने पुस्तक वाचतील.)

१६ वाढदिवशी एकमेकांना पुस्तक भेट देण्याचे आवाहन करण्यात यावे.

१७ वाचन प्रेरणा दिनाचे निमित्त साधून विद्यार्थ्यांनी / नागरिकांनी एकमेकांना पुस्तक भेट द्यावे.

१८ शाळा, महाविद्यालय, ग्रंथालय व इतर संस्थांनी आपल्या परिसरात " डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम वाचन कट्टा " निर्माण करावा.

१९ पुष्पगुच्छ नाही पुस्तक (बुके नाही बुक) - सार्वजनिक कार्यक्रमांत पाहुण्यांना पुष्पगुच्छांऐवजी पुस्तक भेट देण्याच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी व प्रसार करण्यात यावा.

२० वाचन प्रेरणा दिनाच्या बोधचिन्हाचा (लोगोचा) सोशल मिडियाद्वारे आणि रंगीत छापील प्रती काढून प्रसार करण्यात यावा.

२. वाचन प्रेरणा दिवसाच्या निमित्ताने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे लेखन व विचार महत्वाचे आहेतच त्याचबरोबर एकूण वाचन संस्कृती व वाचन प्रेरणा वाढीस लागणे याकरीता दि.१५ ऑक्टोबर हा दिवस " वाचन प्रेरणा दिवस " म्हणून नियोजनबद्धरितीने साजरा करण्यात यावा.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७१००७१६०९३५८००८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Siddharth Kharat

Digitally signed by Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f8cb55012423727bece629d954713c1ec2962a9ca9b909643170e56321cfd24, cn=Siddharth Kharat
Date: 2017.10.07 15:57:54 +05'30'

(सिद्धार्थ खरात)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. विरोधी पक्ष नेता (विधानसभा / विधानपरिषद), विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
५. मा.अ.मु. स., उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
९. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११.संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२.संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३.कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
१४.निवडनस्ती.